महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.साप्रवि/रवका/न.क्र.५/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ३३७ दि. ०२/०५/ २०११

विषय : कर्मचाऱ्याने मुख्यालयाच्या ठिकाणी राहणेबाबत.

संदर्भ : १) प्रशासकीय परिपत्रक क्र.३८५ दि.२९.०३.२००३
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.४४६ दि.२८.०१.२००५
३) प्रशासकीय परिपत्रक क्र.१६ दि.०१.०२.२००६
४) प्रशासकीय परिपत्रक क्र.१०६ दि.१०.०५.२००७
५) प्रशासकीय परिपत्रक क्र.१६७ दि.१२.०८.२००८

.....

उपरोक्त संदर्भिय परिपत्रकांद्वारे कर्मचाऱ्यांनी/अधिकाऱ्यांनी मुख्यालयाच्या ठिकाणी वास्तव्य करून राहण्याबाबत तसेच बिना परवानगीने मुख्यालय सोडून न जाणेबाबतच्या सूचना वेळोवेळी जारी करण्यात आल्या आहेत. तथापि, असे निदर्शनास आले आहे की, अजुनही बरेचशे कर्मचारी/अधिकारी मुख्यालयी राहत नाहीत व दररोज येणे जाणे करतात. तसेच सुट्टीच्या दिवशी नियंत्रण अधिकाऱ्यांची परवानगी न घेता मुख्यालय सोडून जातात.

२. व्यवस्थापकीय संचालक यांनी सदर बाब अतिशय गंभीरपणे घेतली आहे. सबब, सर्व अधिकारी व कर्मचारी यांना निर्देशित करण्यात येते की, जे कर्मचारी/अधिकारी अद्यापही मुख्यालयी राहत नाहीत त्यांनी ताबडतोब मुख्यालयाच्या ठिकाणी वास्तव्यास रहावे. त्याचप्रमाणे सुट्टीच्या दिवशीसुध्दा कोणत्याही अधिकारी/कर्मचारी यांनी नियंत्रण अधिकाऱ्यांची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय मुख्यालय सोडून जाऊ नये. याबाबत संदर्भांकित प्रशासकीय परिपत्रकांद्वारे वेळोवेळी दिलेल्या निर्देशांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

३. संबंधित कार्यकारी संचालक व मुख्य अभियंता यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील कार्यालयांमधील सर्व अधिकारी/कर्मचारी त्यांच्या मुख्यालयाच्या ठिकाणी वास्तव्यास राहतात याची खात्री करावी. तसेच नियंत्रण अधिकाऱ्यांची परवानगी घेतल्याशिवाय सुट्टीच्या दिवशी मुख्यालय सोडून जाणार नाहीत याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी. सूचना देऊनही वरील निर्देशांचे पालन न करणाऱ्या कर्मचारी/अधिकारी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही सुरू करावी.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

*(विजय भि. बागुल)*
***मुख्य महाव्यवस्थापक (क)***

प्रति,
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.